## L. A. BILL No. XI OF 2023.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९६१ चा महा. २४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अअअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम ७३अअअ मधील, पोट-कलम (३) मध्ये, पहिल्या परंतुकामधील, "कोविड-१९ वैश्विक साथरोगाची परिस्थिती विचारात घेऊन राज्यामध्ये टाळेबंदी लादल्यामुळे," हा मजकूर वगळण्यात येईल. १९६१ चा महा. २४.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७८अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७८अ मध्ये, पोट-कलम (१) मधील चौथे परंतुक वगळण्यात येईल.

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याच्या कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकामध्ये इतर गोष्टींबरोबरच अशी तरतूद आहे की, जर समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी समाप्त झाला असेल तर, आणि जर संस्थेच्या समितीची निवडणूक, कोविड-१९ वैश्विक साथरोगाची परिस्थिती विचारात घेऊन राज्यामध्ये टाळेबंदी लादल्यामुळे, घेण्यात आली नसेल तर, समितीचे असे सदस्य आणि पदाधिकारी, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, समितीचे सदस्य आणि पदाधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

कोविड-१९ हा आता वैश्विक साथरोग राहिलेला नाही म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकामधील, कोविड-१९ वैश्विक साथरोगाशी संबंधित संदर्भ वगळणे आवश्यक आहे, असे शासनास वाटते.

२. सहकारी संस्थांच्या निबंधकास, संस्थांच्या कार्यकारी समितीच्या वित्तीय नियमबाह्य बाबी, अफरातफरी, इत्यादींशी संबंधित तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. उक्त अधिनियमाचे कलम ७८अ अन्वये निबंधकास, वित्तीय नियमबाह्य बाबी, अफरातफरी, इत्यादी असतील तर त्याबाबतीत, समितीस अधिक्रमित करण्याचा आणि सहा महिन्यांहून अधिक असणार नाही एवढ्या कालावधीसाठी संस्थेचा कारभार चालविण्यासाठी अशा प्रकारे अधिक्रमित केलेल्या समितीचे सदस्य वगळून तीन किंवा अधिक सदस्यांचा समावेश असलेल्या समितीची किंवा प्रशासकाची किंवा प्रशासकांच्या समितीची नियुक्ती करण्याचा, अधिकार आहे. तथापि, निबंधकास, वर उल्लेखिलेले अधिकार शासनाने भाग धारण केलेले असतील किंवा रोख रकमेच्या स्वरूपात किंवा अन्य प्रकारे कर्ज किंवा वित्तीय सहाय्य केलेले असेल किंवा शासनाने कोणतीही हमी दिलेली असेल, केवळ अशाच संस्थांच्या संबंधात आहेत. म्हणून, उर्वरित संस्था, उक्त कलम ७८अ च्या कक्षेतर्गत आणण्याच्या हेतूने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या उक्त कलम ७८अ मध्ये यथोचित सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १० मार्च, २०२३.

**अतुल सावे,**
सहकार मंत्री.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११–महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यातील उतारे)**

**(सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४)**

**१.** ते **७३अ.** * * * *

**७३अअ.** (१) व (२) * * * * समितीची रचना करणे.

(३) समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा आणि तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी, निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षांपर्यंत असेल आणि पदाधिकाऱ्यांची मुदत समितीच्या मुदतीइतकीच असेल. [३२ड][आणि समितीची मुदत समाप्त झाल्यावर सदस्यांनी समितीचे सदस्य म्हणून आपली अधिकार पदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल.]

"परंतु, जर समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी समाप्त झाला असेल तर, आणि जर संस्थेच्या समितीची निवडणूक, कोविड-१९ वैश्विक साथरोगाची परिस्थिती विचारात घेऊन राज्यामध्ये टाळेबंदी लादल्यामुळे, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांमुळे किवा संस्थेच्या समितीच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणामुळे घेतली जाऊ शकली नसेल तर, समितीचे असे सदस्य आणि पदाधिकारी, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, समितीचे सदस्य आणि पदाधिकारी म्हणून नियमितपणे असल्याचे मानण्यात येईल :" ;

"परंतु आणखी असे की, जर संस्थेच्या समितीची निवडणूक, संस्थेच्या समितींच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणासाठी घेतली जाऊ शकत नसेल तर, समितीचे विद्यमान सदस्य, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, नियमितपणे सदस्य असल्याचे मानण्यात येईल.".

(४) व (५) * * * *

**७३ब.** ते **७३आय.** * * * *

[१]['**७८अ.** (१) निबंधकाच्या मते, समितीने किंवा अशा समितीच्या कोणत्याही सदस्याने, संस्थेच्या किंवा तिच्या सदस्यांच्या हितास बाधक होईल अशी कोणतीही कृती केली असेल किंवा राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निवडणुका घेण्यात कसूर केली असेल. किंवा जेथे समिती किंवा अशा समितीच्या कोणताही सदस्य तिची किंवा त्याची कार्ये पार पाडण्याचे नाकारीत असेल किंवा ती पार पाडणे थांबवले असेल, अशी परिस्थिती उद्‌भवली असेल आणि संस्थेचे कामकाज ठप्प झाले असेल किंवा ठप्प होण्याची शक्यता असेल, अथवा जेथे गंभीर वित्तिय नियमबाह्य बाबी किंवा अफरातफरी उघडकीस आल्या असतील किंवा अशा आशयाचे न्यायिक निदेश देण्यात आलेले असतील किंवा जेथे सतत गणपूर्ती होत नसेल तेथे किंवा निबंधकाच्या मते, कलम ७८ च्या पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कारणांवर सुधारात्मक उपाययोजना केल्या नसतील किंवा त्याचे अनुपालन केले नसेल तेथे किंवा जेथे अशा समितीचा कोणताही सदस्य, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखालील समितीचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह झाला असेल तेथे, निबंधक, समितीला किंवा यथास्थिती, सदस्याला तिच्या किंवा त्याच्या कोणत्याही आक्षेपांविषयी, कलम ७८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लेखी निवेदन करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याबाबत म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, व ती संस्था जिच्याशी संलग्न असेल त्या संघीय संस्थेशी विचार विनिमय केल्यानंतर नोटिशीमध्ये नमूद केलेले दोषारोप सिद्ध झाले आहेत आणि हा अधिनियम, नियम व उपविधी यांच्या तरतुदींअन्वये संस्थेचे प्रशासन चालवले जाऊ शकत नाही या निष्कर्षाप्रत आला असेल तर, त्याबाबतची कारणे नमूद करून तो आदेशाद्वारे,— समितीस निष्प्रभावित करण्याचा किंवा तिच्या सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार.

(अ) (एक) समितीस निष्प्रभावित करील, आणि

(दोन) बारा महिन्यांहून अधिक असणार नाही एवढ्या कालावधीसाठी संस्थेचा कारभार चालविण्यासाठी त्या समितीच्या जागी अशाप्रकारे निष्प्रभावित केलेल्या समितीचे सदस्य वगळून तीन किंवा अधिक सदस्यांचा समावेश असलेली समिती किंवा प्रशासक किंवा प्रशासकांची समिती, जे संस्थेचे सभासद असणे आवश्यक नसेल, यांची नियुक्ती करील :

परंतु, या पोट-कलमान्वये काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वीसुद्धा निबंधकाला, समिती किंवा तिचा कोणताही सदस्य अथवा नेमलेला प्रशासक किंवा नेमलेले प्रशासक स्वेच्छाधिकाराने बदलण्याचा अधिकार असेल :

परंतु आणखी असे की, अशी संघीय संस्था सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत निबंधकाला आपले मत कळवील, असे करण्यास कसूर केल्यास अशा संघीय संस्थेला अशी समिती निष्प्रभावित करण्याबाबतच्या किंवा सदस्यांना काढून टाकण्याच्या आदेशाबद्दल कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि निबंधकाला त्यानुसार आणखी कार्यवाही सुरू करण्याचे स्वातंत्र्य असेल :

परंतु तसेच की, बँकींग व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँकींग विनियमन अधिनियम, १९४९ चा
१९४९ च्या तरतुदीसुद्धा लागू होतील आणि अशा संस्थेची समिती, एकावर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी १०.
निष्प्रभावित केली जाणार नाही :

परंतु तसेच की, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट जेथे शासनाने भाग धारण केलेले नसतील किंवा रोख रकमेच्या स्वरूपात किंवा अन्य प्रकारे कर्ज किंवा वित्तिय सहाय्य केलेले नसेल किंवा शासनाने कोणतीही हमी दिली नसेल तर अशा संस्थेला लागू होणार नाही ;

(ब) सदस्याला काढून टाकू शकेल :

परंतु, अशाप्रकारे ज्याला काढून टाकण्यात आलेले असेल तो सदस्य त्याला ज्या दिनांकास काढून टाकण्यात आले असेल त्या दिनांकापासून समितींच्या पुढच्या एका कालावधीची मुदत समाप्त होईपर्यंत कोणत्याही संस्थेच्या, कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही :

परंतु आणखी असे की, बँक व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँकीग विनियमन १९४९ चा
अधिनियम, १९४९ याच्या तरतुदीसुद्धा लागू होतील. १०.

(२) * * * *

**७९.** ते **१६८.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११.]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. अतुल सावे,**
सहकार मंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई